# प्रेस नोट

**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**दि.२६.०५.२०२३**

आलोसे रविंद्र भाऊराव जोशी, वय—५७, लेखा अधिकारी, प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,यावल ता.यावल जि.जळगांव रा.नेहरु नगर,मोहाडी रोड,जळगांव ता.जि.जळगांव यांनी प्रथम ३६,५००/— रुपये व तडजोडीअंती २०,०००/—रुपये लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :— | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद कमांक** | :— | यावल पो.स्टे. गु.र.नं.२७६/२०२३ |
| ३ | **कलम** | :— | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम—७ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :— | आलोसे रविंद्र भाऊराव जोशी, वय—५७, लेखा अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,यावल ता.यावल जि.जळगांव रा. नेहरु नगर,मोहाडी रोड,जळगांव ता.जि.जळगांव<br>**( लेखा व कोषागारे विभाग, वर्ग २)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :— | दि.२६/०५/२०२३ रोजी<br>प्रथम ३६,५००/—रु. व तडजोडीअंती २०,०००/—रु.लाचेची मागणी केली आहे. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :— | २०,०००/— रुपये. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :— | दि.२६/०५/२०२३ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :— | यातील फिर्यादी यांनी त्यांची पत्नी सौ.नंदाबाई मावळे यांचे नावे दहिवद ता.अमळनेर येथे सप्तश्रृंगी माता आदिवासी महिला बहुउद्देशीय संस्थेला सन २०२१—२०२२ या शैक्षणिक वर्षाकरिता आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह (नविन) ता.चोपडा,जि.जळगाव येथील मुलांना दैनंदिन भोजन,नास्ता,दुध,मासांहार व फलहार पुरविण्याचा ठेका मिळालेला होता. त्यानुसार फिर्यादी यांनी सदर वसतीगृहास भोजन पुरवठा केलेला असुन, त्या मोबदल्यात प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प,यावल कार्यालयाकडुन फिर्यादी यांचे पत्नीचे नावे असलेल्या संस्थेच्या बॅक खात्यात ७३,००,०००/— रुपयांची रक्कम वेळोवेळी ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात आली आहे. सन २०२२— २०२३ या शैक्षणिक वर्षामधील ई निविदा प्रक्रीयाद्वारे ठेका वितरीत करण्याची प्रक्रीया अपुर्ण असल्याने, प्रकल्प अधिकारी,एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प,यावल यांचे कार्यालयाकडुन दि.३०.०६.२०२२ रोजी फिर्यादी यांचे पत्नीचे नावे असलेल्या संस्थेस भोजन पुरवठा करण्याच्या ठेक्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.<br>दि.२८.०४.२०२३ रोजी फिर्यादी हे एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प,यावल यांचे कार्यालयात अंडी पुरवठा केलेल्या बिलांचा १५,४८,२२६/— रु चा डी.डी. घेण्यासाठी गेले होते. तेव्हा सदर कार्यालयातील लेखाधिकारी श्री.रविंद्र भाऊराव जोशी,यांनी सन २०२१—२०२२ या शैक्षणीक वर्षात फिर्यादी यांचे पत्नीचे संस्थे मार्फत पुरविण्यात आलेल्या भोजन साहित्याचे बिलामध्ये कोणतीही त्रुटी न काढता सदर बिलांचे ७३,००,०००/— रुपये फिर्यादीचे पत्नीचे बॅक खात्यात वेळोवेळी ऑनलाईन पध्दतीने जमा केल्याचे सांगुन, सदर रकमेपैकी अर्धा टक्के प्रमाणे ३६,५००/— रुपयाची मागणी केली. त्याबाबत फिर्यादी यांनी दि.२६.०५.२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची ला.प्र.वि.जळगाव पथकाने दोन पंचासमक्ष दि.२६.०५.२०२३ रोजी पडताळणी केली असता यातील आलोसे यांनी फिर्यादी यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या वर नमुद संस्थे मार्फत सन २०२१—२०२२ या शैक्षणिक वर्षाकरिता आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह (नविन) ता.चोपडा,जि.जळगाव येथील मुलांना पुरविण्यात आलेल्या भोजनाचे बिलात कोणतीही त्रुटी न काढता, सदर बिलाची ७३,००,०००/— रुपयांची रक्कम संस्थेच्या बॅक खात्यात जमा केल्याचे मोबदल्यात बक्षीस म्हणुन सदर रकमेच्या अर्धा टक्के प्रमाणे फिर्यादीकडे प्रथम ३६,५००/— रुपये व तडजोडीअंती २०,०००/—रुपये लाच रकमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आलोसे यांनी स्वत: वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:—** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:—** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:—** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री कमांक:—** 1064,**दुरध्वनी कमांक:—**0257-2235477

**व्हॉटस्अॅप कमांक:—** 8766412529

26.05.2023

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**